**स्थायी निदेश क्र.२६**

**नगरपरिषदेचा आस्थापना खर्च परिगणित करण्याबाबत एकत्रित आदेश**

( या स्थायी आदेशामध्ये खालील आदेश समाविष्ट करण्यांत आलेले आहेत.)
१. **आदेश क्र.नपप्रसं २००५/आस्था खर्च/प्र.क्र.९१/ २००५/का-२४, दि.११.७.२००५**
२. आदेश क्र.नपप्रसं २००५/आस्था खर्च/प्र.क्र.९१/ २००५/का-२४, दि.२८.३.२००६ )

---

**नगरपरिषद प्रशासन संचालनालय,**
**शासकीय परिवहन सेवा इमारत,**
**३ रा मजला, सर पोचखानवाला मार्ग, वरळी, मुंबई - ४०० ०३०.**
**क्र.नपप्रसं २००५/आस्था खर्च/प्र.क्र.९१/२००५/का-१०**
**दिनांक : २३ फेब्रुवारी २००५**

**वाचा :** १) शासन परिपत्रक क्र.ओडीओ १२७०/५४३२८-A, दि.१५ जुलै १९७१
२) शासन निर्णय नगर विकास विभाग क्र.संकीर्ण १०९९/२९४/प्र.क्र.७८/२०००/नवि २७, दि.२८.९.२०००

**प्रस्तावना**

राज्यातील नगरपरिषदांमध्ये आस्थापना खर्चाची मर्यादा विहीत करण्याबाबत शासनाने उपरोक्त वाचा क्र.१ व २ नुसार आदेश निर्गमित केलेले आहेत. शासनाने आस्थापना खर्च परिगणित करताना नगरपरिषदेने खर्चामध्ये कोणत्या बाबी विचारात घ्यावयाच्या याबाबत शासन निर्णय नगर विकास विभाग क्र.संकीर्ण १०९९/२९४/प्र.क्र.७८/ २०००/नवि २७, दि.२८.९.२००० अन्वये सूचना दिलेल्या आहेत. मात्र नगरपरिषदेने उत्पन्नामध्ये कोणत्या बाबी अंतर्भूत कराव्यात याबाबतच्या स्पष्ट सूचना नगरपरिषदांना देण्यात आलेल्या नाहीत. त्यामुळे नगरपरिषदांमध्ये आस्थापना खर्च परिगणित करण्यामध्ये संदिग्धता दिसून येते.

नगरपरिषदांचे पदनिर्मिती, रोजंदारी कर्मचाऱ्यांना नियमित करणे व पाचवा वेतन आयोग लागू करणे इ.प्रस्ताव मान्यतेसाठी प्राप्त होत असतात. या प्रस्तावामध्ये आस्थापना खर्च चुकीचा परिगणित केल्याचे या संचालनालयाचे निदर्शनास आल्यानंतर तो सुधारीत करुन पाठविण्यामध्ये अनावश्यक विलंब होत असतो. हा विलंब टाळण्यासाठी नगरपरिषदांनी आस्थापना खर्च परिगणित करण्यासाठी सोबतचे परिशिष्ट अ,ब व क विहीत करण्यात येत आहे. आस्थापना खर्च परिगणित करण्यासाठी पुढीलप्रमाणे निदेश देण्यांत येत आहेत.

निदेश

०१.- नगरपरिषदांचे पदनिर्मिती, रोजंदारी कर्मचाऱ्यांना नियमित करणे व पाचवा वेतन आयोग लागू करणे इ.प्रस्ताव सक्षम प्राधिकाऱ्याकडे सादर करताना सोबतच्या परिशिष्ट अ,(नगरपरिषदेचे उत्पन्न) परिशिष्ट ब (नगरपरिषदेच्या पाणी पुरवठा योजना उत्पन्न) परिशिष्ट क (आस्थापना खर्च) नुसार आस्थापना खर्चाची टक्केवारी नमूद करुन पाठविण्याची दक्षता घेण्यात यावी.

०२. आस्थापना खर्च परिगणित करताना सोबतच्या परिशिष्ट अ, ब व क मध्ये मागील तीन वर्षाची महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम १०२ मधील तरतुदीनुसार अहवालाच्या वर्षात (प्रस्तावाच्या) दि.३१ जुलै अखेर प्रसिध्द करण्यात आलेल्या नगरपरिषदेच्या लेख्यामधील प्रत्यक्ष रकमा (लाखामध्ये) नमूद करण्यात याव्यात.आस्थापना खर्च नमूद करताना अंदाजपत्रकातील अंदाजित रकमा नमूद करण्यात येऊ नये.

नगरपरिषदेने जर उत्पन्न वाढीसाठी जर विशेष प्रयत्न केले असतील तर त्यासाठी सातत्याने उत्पन्न मिळणार असेल तर असे उत्पन्न धरण्यास यावे.

०३. परिशिष्ट अ -नगरपरिषदेचे उत्पन्न

अ) उत्पन्नामध्ये प्रत्यक्ष प्राप्त झालेल्या रकमा नमूद करण्यात यावी. वसूल होणाऱ्या थकीत असलेल्या रकमा नमूद करण्यांत येऊ नयेत.

ब) परिशिष्ट-ब मध्ये पाणीपट्टीपासूनचे उत्पन्न घेण्यांत येत असल्यामुळे परिशिष्ट -अ मध्ये उत्पन्न घेण्यांत येऊ नये.

क) नगरपरिषदेस शासनाकडून मिळणारे प्रतिपूर्ती अनुदान (फक्त प्राप्त झालेलेच) उत्पन्नामध्ये धरण्यात यावे.

ड) नगरपरिषद भूखंड विक्री, मत्ता विक्रीतून प्राप्त उत्पन्न हे एकवेळ मिळालेले असते म्हणून असे उत्पन्न विचारात घेऊ नये. फक्त नियमित व दरवर्षी मिळणारेच उत्पन्न विचारात घेण्यांत यावे.

इ) नगरपरिषदेने अनामत म्हणून घेतलेल्या रकमा हया परत करावयाच्या असल्यामुळे अशा रकमा नगरपरिषदेच्या उत्पन्नामध्ये घेण्यांत येऊ नयेत.

फ) शिक्षण कर व रोजगार हमी कर हा शासनासाठी वसूल करुन शासनाकडे जमा करावा लागतो. त्यामुळे या करांपासूनचे उत्पन्न उत्पन्नामध्ये घेतले जात नाही, तीच पध्दत कायम ठेवण्यात यावी.

ग) विशिष्ट बाबींसाठी प्राप्त झालेली अनुदाने ही ज्या बाबींसाठी अनुदाने प्राप्त झाली आहेत त्या बाबींसाठीच खर्च करावी लागतात म्हणून विशिष्ट बाबींसाठी प्राप्त झालेली सर्व अनुदानाच्या रकमा आस्थापना खर्च काढताना नगरपरिषदेकडून उत्पन्नामध्ये नमूद केला जात नाहीत, तीच पध्दत कायम ठेवण्यात यावी.

ह) नगरपरिषदेतील उत्पन्न व अंदाजपत्रकातील प्रत्यक्ष उत्पन्न याचा ताळमेळ घेण्यासाठी परिशिष्ट-अ मध्ये अ.क्र. ५ येथे इतर उत्पन्न नमूद करण्यांत यावे.

०४. परिशिष्ट ब - पाणीपुरवठा योजनेवरील उत्पन्न

अ) आस्थापना खर्च काढतांना पाणी पुरवठा विभागातील खर्च अंतर्भूत असल्यामुळे पाणी पुरवठा विभागातील कर्मचाऱ्यांचे आस्थापनेवरील खर्च घेण्यात येऊ नये. (हे परिशिष्ट-क मध्ये अंतर्भूत आहे)

ब) पाणी पुरवठा योजनेवरील एकूण खर्च काढतांना पाणी पुरवठयावरील देय परंतु अदा न झालेल्या रकमा (कर्ज, व्याज, वीज बिल, पाणी खरेदी इ.) खर्चामध्ये समाविष्ट करण्यांत यावे.

क) नळ जोडणी (कनेक्शन) परिशिष्ट-अ मध्ये घेतले असल्यामुळे परिशिष्ट-ब मध्ये घेऊ नये.

ड) भांडवली खर्च परिशिष्ट-क मध्ये घेतला असल्याने परिशिष्ट-ब मध्ये घेऊ नये .

इ) पाणी पुरवठा योजनेवर तूट जर असेल तर उत्पन्नामधून वजा करणे आवश्यक आहे तसेच पाणी पुरवठयावर नफा असेल तर उत्पन्नामध्ये जमा करणे आवश्यक आहे.

०५. परिशिष्ट क- आस्थापना खर्चाच्या बाबी

अ) शासन निर्णय नगर विकास विभाग क्र.संकीर्ण १०९९/२९४/प्र.क्र.७८/२०००/नवि-२७,दि. २८.९.२००० नुसार आस्थापना खर्चाच्या बाबी (कर्मचाऱ्यांचे नियमित वेतन, निवृत्ती वेतन, रोजंदारी वेतन, प्रशासनावरील खर्च, कार्यालयीन खर्च इ.) यांचा समावेश करण्यांत यावा.

(आदेश दिनांक २८.३.२००६ अन्वये (ब) व (क) वगळण्यांत आला आहे.)

ड) आस्थापनेवर खर्च करणे आवश्यक असतांना नगरपरिषदेने खर्च/जमा न केलेल्या रकमा आस्थापना खर्चामध्ये धरण्यांत याव्या.

इ) अ.क्र. ५ येथे इतर खर्च दर्शविण्यांत यावा जेणेकरुन अंदाजपत्रकातील रकमांशी ताळमेळ करणे शक्य होईल.

०६. आस्थापना खर्चाची टक्केवारी परिगणना करण्याची पध्दत.

अ) आस्थापना खर्चाची टक्केवारी काढताना पाणीपुरवठा योजनांवरील खर्च (आस्थापना खर्च वगळता) उत्पन्नापेक्षा जास्त असल्यास पाणीपुरवठा योजनेवर नगरपरिषद निधीतून खर्च करावी लागणारी अतिरिक्त

रक्कम नगरपरिषदेच्या उत्पन्नामधून वजा करुन आस्थापना ख़र्च परिगणीत करण्याची पध्दत पूर्वीप्रमाणेच ठेवण्यात यावी.

ब) सूत्र :-

$$\text{आस्थापना खर्चाची टक्केवारी} = \frac{\text{परिशिष्ट- क (३)}}{\text{परिशिष्ट- अ (३) + परिशिष्ट-ब (३)}} \times १००$$

०७. मुख्याधिकारी यांनी नगरपरिषदेचे प्रस्ताव शासनास पाठविताना या स्थायी निदेशानुसार आस्थापना खर्चाची टक्केवारी नमूद करुन पाठवावेत. नगरपरिषदेचे प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर जिल्हाधिकारी / विभागीय आयुक्त यांनी या स्थायी निदेशानुसार तपासणी करुन प्रस्तावावर प्राधान्याने कार्यवाही करावी.

०८. लेखापाल/वरीष्ठ लिपिक, अंतर्गत लेखापरीक्षक व मुख्याधिकारी यांनी स्वाक्षरीत केलेले प्रमाणपत्र सोबतच्या नमुन्यानुसार सादर करावे.

**प्र मा ण प त्र**

प्रमाणित करण्यात येते की,

- उपरोक्त स्थायी निदेश क्र.२६ च्या तक्त्यामधील माहितीचे काळजीपूर्वक अवलोकन केले आहे.
- खर्चाची परिगणना करण्याबाबतची माहिती नगरपरिषदेच्या लेख्याप्रमाणे (Account) प्रमाणे बरोबर आहे.
- खर्चाची परिगणना परिशिष्ट्चे अ,ब व क मधील कोणतीही माहिती अगर कोणताही रकाना वगळण्यात आला नाही.

| | | |
|---|---|---|
| (स्वाक्षरी) | (स्वाक्षरी) | (स्वाक्षरी) |
| लेखापाल/वरिष्ठ लिपिक | अंतर्गत लेखापरीक्षक | मुख्याधिकारी |
| नगरपरिषद-------------- | नगरपरिषद-------------- | नगरपरिषद------------ |

०९. नगरपरिषदेमध्ये लेखापालाचे काम करणारे कर्मचारी/अधिकारी यांनी स्थायी निदेश क्र.२६ च्या तक्त्यांमधील माहिती काळजीपूर्वक भरावी. आस्थापना खर्च जास्तीचा होऊ नये म्हणून एखादी बाब वगळून खर्चाची परिगणना चुकीची केल्याचे आढळून आल्यास अशा कर्मचारी/अधिकाऱ्याची वेतनवाढ व पदोन्नती तीन वर्षे खंडित करण्यात येईल. (परिच्छेद ०८ व ०९ संचालनालयाचे आदेश दि. ११.७.२००५ अन्वये समाविष्ट)

(सुनील सोनी)
आयुक्त तथा संचालक
नगरपरिषद प्रशासन संचालनालय

प्रति,
१) प्रधान सचिव, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
२) विभागीय आयुक्त व प्रादेशिक संचालक, नगरपरिषद प्रशासन (सर्व) विभाग
३) मुख्याधिकारी (सर्व)
४) जिल्हाधिकारी (सर्व)
५) उपमुख्य लेखापरिक्षक, स्थानिक निधी लेखा (सर्व)
६) सर्व अधिकारी/कर्मचारी, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, मुंबई.
७) निवडक नस्ती.

## परिगणना परिशिष्ट-अ

महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम १०२ मधील तरतुदीनुसार नगरपरिषदेच्या लेख्यावरुन मागील तीन वर्षाचे आकडे लाखांमध्ये नमूद करण्यात यावेत.

| अ.क्र. | उत्पन्न | मागील २ वर्ष | मागील १ वर्ष | अहवाल वर्षातील ३१ जुलै अखेर |
|---|---|---|---|---|
| १. | **नगरपरिषदेचे उत्पन्न** | | | |
| अ | एकत्रित मालमत्ता कर (शिक्षण, रोजगार हमी वगळून) | | | |
| ब | **नगरपरिषद वाणिज्य कर पासूनचे उत्पन्न :** | | | |
| | १.सक्तीचे कर ( कलम १०५ नुसार ) | | | |
| | जाहिरात कर | | | |
| | खेळावरील कर (show Tax) | | | |
| | २.ऐच्छिक कर ( कलम १०८ नुसार) | | | |
| | विशेष स्वच्छता कर व जलनि:स्सारण कर | | | |
| | विशेष शिक्षण कर | | | |
| | पथ कर, वाहन, प्राणी इ. वरील कर | | | |
| | ३.कलम १८८, २७२,२७३ ते २८१ व इतर | | | |
| | बाजारापासून उत्पन्न | | | |
| | इतर व्यवसायापासून उत्पन्न ( परवाना फि वगैरे) | | | |
| | ४. विशेष अधिनियमाखाली वसूली | | | |
| | **एकूण** | | | |
| क | **नगरपरिषद मालमत्ता यांच्यापासून मिळालेल्या महसूलाचे उत्पन्न** | | | |
| | १.इमारत भाडे ( मार्केट, शाळा व इतर मालमत्ता) | | | |
| | २.कलम १०८-अ अन्वये लागू करण्यात आलेल्या ऐच्छिक फी पासून उत्पन्न | | | |
| | ३.नगरपरिषद रस्ते, मोकळ्या जागा यांचा तात्पुरता वापर, प्रक्षेपण इ.वरील फी | | | |
| | ४.नगरपरिषद रस्ते, मोकळ्या जागांवर इमारत बांधकाम साहित्य /डांबर इत्यादी टाकणे तात्पुरत तात्पुरता वापर फी | | | |
| | ५.जलोत्सारण (सांडपाणी) निचरा / जोडणी शुल्क | | | |
| | **एकूण** | | | |
| ड | **खाजगी जागेवरील विकास कामासाठी वसूली :** | | | |
| | १.विकास शुल्क ( बाधंकाम परवाना, रेखाकंन ) | | | |
| | २.गच्ची ( बाल्कनी ), जिना( स्टेअरकेस) लाभांश | | | |
| | ३.बांधकाम नियमानुकूल करणे (कंपौडींग फी) | | | |
| | ४.गुंठेवारी , अनधिकृत बांधकाम नियमानुकूल करणे इ.पासूनचे उत्पन्न | | | |
| | **एकूण** | | | |
| इ | **उपयोगिता सेवा आणि संकिर्ण बाबींपासूनचे उत्पन्न :** | | | |
| | १.भूखंड/ इमारत हस्तांतर / भूखंड विभागणी नोंद शुल्क, | | | |
| | २.जन्म मृत्यू, नक्कल फी, प्रकाशने, यादया इ. विक्रि उत्पन्न | | | |
| | ३.नोटीस फी, लायसन्स फी, दंड | | | |
| | ४.दवाखाना, ग्रंथालय फी, कोंडवाडा, कत्तलखाना, समाजमंदिर, नाटयगृह पासून उत्पन्न | | | |
| | ५.अग्निशमन, पाणी टॅंकर शुल्क | | | |
| | ६.अतिक्रमण, अनधिकृत बांधकाम काढण्याबाबतचे शुल्क | | | |
| | ७.घनकचरा व्यवस्थापनासाठी विशेष कर | | | |
| | **एकूण** | | | |
| | **एकूण:- (१) = (अ+ब+क+ ड+ इ)** | | | |
| २. | अनुदाने | | | |
| | १. महागाई भत्ता | | | |
| | २. मुख्याधिकारी वेतन | | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | ३. करमणूक कर | | | |
| | ४. जमीन महसूल आणि अकृषिक | | | |
| | ५. मुद्रांक शुल्क | | | |
| | ६.मोटार वाहन कर | | | |
| | ७. यात्रा कर | | | |
| | ८. गौण खनिज | | | |
| | ९.व्यवसाय कर | | | |
| | १०.जकात अनुदाने | | | |
| | ११.शिक्षण आणि दवाखाने यांच्या विभागातील कर्मचाऱ्यांच्या वेतनावर मिळणारे अनुदान | | | |
| | एकूण :- (२) | | | |
| ३ | एकूण :- (१ + २) | | | |
| ४ | आस्थापना खर्च काढताना वगळावयाचे उत्पन्न | | | |
| | १. पाणी पुरवठा योजनेवरील उत्पन्न (परिशिष्ट ब नुसार) | | | |
| | २. विशिष्ट कार्यासाठी प्राप्त अनुदान (आमदार /. खासदार निधी /UD ६/BDBDSNT/वित्त आयोग आयोग/ स्थानिक विकास / तीर्थक्षेत्र / रस्ता) | | | |
| | ३.जमिनीचा खंड ( लिज ) लाभांश (Premium)/ न.प.मालमत्ता विक्रीपासून उत्पन्न | | | |
| | ४. अनामत रक्कमेपासूनचे उत्पन्न | | | |
| | एकूण | | | |
| ५ | वर्षाचे एकूण उत्पन्न (३ +४) | | | |
| | १. एकूण इतर उत्पन्न | | | |
| | २.अंदाजपत्रकातील प्रत्यक्ष उत्पन्न | | | |

## परिगणना परिशिष्ट-ब

महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम १०२ मधील तरतुदीनुसार नगरपरिषदेच्या लेख्यावरुन मागील तीन वर्षाचे आकडे लाखांमध्ये नमूद करण्यात यावेत.

| अ.क्र | पाणी पुरवठा | मागील २ वर्ष | मागील १ वर्ष | अहवाल वर्षातील ३१ जुलै अखेर |
|---|---|---|---|---|
| १ | पाणी पुरवठयाचे उत्पन्न | | | |
| | १. घरगुती नळ कनेक्शन पासून पाणीपट्टी | | | |
| | २. वाणिज्य नळ कनेक्शन पासून पाणीपट्टी | | | |
| | ३. औद्योगिक नळ कनेक्शन पासून पाणीपट्टी | | | |
| | ४. सार्वजनिक पाणीपट्टी | | | |
| | ५. इतर पाणी विक्री उत्पन्न | | | |
| | एकूण उत्पन्न | | | |
| २ अ | पाणीपुरवठयावरील खर्च | | | |
| | १. पाणीपुरवठा देखभाल व दुरुस्ती | | | |
| | २. पाणीपुरवठा वीज बिल | | | |
| | ३. पाणी खरेदी | | | |
| | ४. कर्ज व व्याज | | | |
| | ५. इतर | | | |
| | एकूण | | | |
| ब | देय परंतु अदा न झालेल्या पाणी पुरवठा योजनेबाबतच्या रक्कमा | | | |
| | १. कर्ज व व्याज | | | |
| | २. वीज बील | | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | ३. पाणी खरेदी | | | |
| | ४. इतर | | | |
| | एकूण | | | |
| | एकूण खर्च :- ( अ + ब ) | | | |
| ३ | पाणी पुरवठा योजनेवरील एकूण निव्वळ उत्पन्न :- (१ - २) (+ / - ) | | | |

## परिगणना परिशिष्ट-क

महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम १०२ मधील तरतुदीनुसार नगरपरिषदेच्या लेख्यावरुन मागील तीन वर्षाचे आकडे लाखांमध्ये नमूद करण्यात यावेत.

| अ.क्र. | आस्थापना खर्च | मागील २ वर्ष | मागील १ वर्ष | अहवाल वर्षातील ३१ जुलै अखेर |
|---|---|---|---|---|
| १. | आस्थापना खर्च : | | | |
| अ | कर्मचारी आस्थापना : | | | |
| | १) स्थायी आस्थापना | | | |
| | २) अस्थायी आस्थापना | | | |
| | ३) रोजंदारी आस्थापना | | | |
| ब | कर्मचाऱ्यांना दिलेल्या आर्थिक लाभावरील खर्च:<br>(बोनस, सानुग्रह अनुदान, कालबध्द पदोन्नती,<br>५वा ५ वावेतन आयोग थकबाकी, वैद्यकीय खर्च प्रतिपूर्ती, स्वग्राम भत्ता,<br>प्रवास भत्ता, अतिरिक्त कार्यभार, गणवेश व साहित्य, प्रशिक्षण इ.) | | | |
| क | निवृत्त कर्मचाऱ्यांवरील खर्च:<br>(निवृत्तीवेतन, उपदान, रजारोखीकरण, भविष्य निर्वाह निधी. इ. सह) | | | |
| | ( आदेश दिनांक २८.३.२००६ अन्वये (ड) व (इ) वगळण्यांत आला आहे.) | | | |
| | एकूण : ( अ ते क ) | | | |
| २. | आस्थापनेसाठी आवश्यक परंतु खर्च न केलेल्या रकमा : | | | |
| अ | कर्मचाकर्मचाऱ्यांच्या वेतनातून कपात केलेली परंतु संबंधित खात्यात जमा न केलेल्या रकमा: | | | |
| | १. भविष्य निर्वाह निधी | | | |
| | २. विमा | | | |
| | ३.सोसायटी | | | |
| | ४.आर.डी. | | | |
| | ५.इतर | | | |
| | एकूण :- (अ) | | | |
| ब | अधिनियमानुसार निश्चित केलेल्या फंडामध्ये कमी असणारी रक्कम: | | | |
| | १.भ.नि.नि. | | | |
| | २.निवृत्तीवेतन | | | |
| | ३.वेतन राखीव | | | |
| | ४.इतर निधी | | | |
| | एकूण :- (ब) | | | |
| | एकूण :- (अ + ब) | | | |
| ३. | एकूण आस्थापना खर्च :- (१ +२) | | | |
| ४. | आस्थापना / प्रशासकीय वगळून इतर खर्च | | | |
| | १. देखभाल दुरुस्तीवर खर्च | | | |
| | २. विकास कामावर खर्च | | | |
| | ३. इतर खर्च | | | |
| | एकूण :-. | | | |
| ५ | वर्षाचे एकूण खर्च :- (३ +४) | | | |
| | १. एकूण इतर खर्च | | | |
| | २.अंदाजपत्रकातील प्रत्यक्ष खर्च | | | |